रे. मु. क्र. २१/२०१०
(CNR No.MHAK07-000151-2010)

: <u>निशाणी ९१ वर आदेश</u> :

१. सदर अर्ज प्रतिवादी सुभाष रामचंद्र मसने मयत झाल्याचे पश्चात वारस सामील करणेस झालेला उशीर माफ करून अबेटमेंटचा हुकुम रदद होणेस दाखल केला आहे. अर्जाच्या पुष्टयर्थ प्रतिज्ञापत्र दाखल आहे.

२. नियोजित वारसांनी निशाणी ९६ वर अर्जास हरकत घेवून म्हणणे दिले की, प्रस्तुत अर्ज न्यायाच्या दृष्टीने योग्यतेचा नसुन तो मुदतबाहय आहे. अर्जामध्ये काहीही तथ्य नसल्याने प्रस्तुत अर्ज खारीज करण्यात यावा. अर्ज व म्हणणे वाचले. दोन्ही पक्षांचा युक्तीवाद ऐकला.

३. प्रतिवादी सुभाष रामचंद्र मसने हे दिनांक २२.०३.२०२१ रोजी मयत झाल्याचे अभिलेखावरुन दिसुन येते. अर्जातील नमूद कारण पाहता ते संयुक्तीक आहे. प्रस्तुत अर्ज देण्यास विलंब झालेला असला तरी प्रस्तुत दाव्याचे स्वरूप पाहता दोन्ही पक्षातील वादाचे संपूर्ण निराकरण होण्यासाठी अर्ज मंजुर करणे न्यायाच्या हितास्तव आहे. सबब अर्ज खालील आदेशाप्रमाणे मंजुर करण्यात येतो.

**<u>: आ दे श :</u>**

१. अर्ज वादी यांनी नियोजित वारसांना एकत्रितरित्या रक्कम रूपये १००/- खर्च देण्याच्या अटीवर मंजुर करण्यात येतो.

२. प्रतिवादी सुभाष रामचंद्र मसने यांचे वारस सामील करणेस झालेला उशीर माफ करून अबेटमेंटचा हुकुम रदद करण्यात येतो.

३. अर्जाचा खर्च अर्जदारावर ठेवण्यात येतो.

बाळापूर.
दिनांक : ०१.०९.२०२१.

(चं. प्र. रघुवंशी)
दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, बाळापूर

Certificate

I affirm that the contents of this P.D.F. file are same word for word as per original order.

| | | |
|---|---|---|
| Name of Steno | : | Shaikh Rafique |
| Court Name | : | C.J.J.D. & J.M.F.C., Balapur. |
| Date | : | 01/09/2021. |
| Signed by Presiding Officer on | : | 01/09/2021. |
| Uploaded on | : | 01/09/2021. |

-----------------------------------------------------------------------------------------